## जनसंपर्क विभाग

जळगाव ६ (                ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा नामविस्तार आनंद सोहळा सोमवार दिनांक ८ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा होत आहे.

११ ऑगस्ट, २०१८ रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा नामविस्तार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असा करण्यात आला. या नामविस्तारानिमित्त सोमवार दिनांक ८ ऑक्टोबर रोजी आनंद सोहळा साजरा केला जाणार आहे. विद्यापीठात सोमवारी दुपारी २.४५ वाजता होणाऱ्या या समारंभासाठी मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. यावेळी जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे, वैद्यकिय शिक्षण व जलसंपदा मंत्री श्री.गिरीष महाजन, नंदूरबार जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.जयकुमार रावल, धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.दादाजी भूसे, उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री श्री.रवींद्र वायकर, सहकार राज्यमंत्री श्री.गुलाबराव पाटील अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील राहतील. प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर यांचीही यावेळी उपस्थिती असणार आहे. विद्यापीठाच्या पदवीप्रदान सभागृहात हा समारंभ होणार आहे. ऐनवेळी हा कार्यक्रम ठरला असल्यामुळे वेळेअभावी निमंत्रण पत्रिका सर्वांना पाठविणे शक्य नसल्यामुळे निमंत्रणाची वाट न पाहता सर्व शिक्षणप्रेमींनी या समारंभास आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन कुलसचिव श्री.भ.भा.पाटील यांनी केले आहे.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 6 ऑक्टोबर, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी